# महिला पुरुष समानता देशाच्या विकासासाठी आवश्यकॲड. नितीन ठाकरे –सरचिटणीस, मराठा विद्या प्रसारक समाज

Posted By: गणतंत्र न्यूज़   on: January 29, 2025   In: ताज्या घडामोडी   No Comments




नाशिक ( प्रतिनिधी)मराठा विद्या प्रसारक समाज संचलित समाजकार्य महाविद्यालयात "सामाजिक आव्हाने" या शीर्षकाखाली आयोजित एक दिवशी राज्यस्तरीय परिसंवाद दिनांक 28/ 01/ 2025 रोजी संपन्न झाला. या परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस आदरणीय अॅड.नितीन ठाकरे हे होते. प्रस्तुत उद्घाटनाप्रसंगी महिला सबलीकरण या विषयाला अनुसरुन महिलांची प्रगती, महिलांची समानता आणि त्यांचा सामाजिक, आर्थिक विकासात समान संधी हीच देशाची प्रगती होय त्यातूनच देशाचा खऱ्या अर्थाने विकास होईल असे प्रतिपादन नितीन ठाकरे यांनी केली. या उद्घाटन प्रसंगी मविप्रचा महिला संचालिका आदरणीय सालन ताई सोनवणे , अंजली मायदेव/आंबेडकर, डॉ .मयंक परमार , मविप्र शिक्षणाधिकारी डॉ.नितीन जाधव, आय. एम. आर. टी. चे संचालक डॉ. प्रशांत सूर्यवंशी , मविप्र शिक्षणाधिकारी प्राचार्य डॉ.विलास देशमुख , अंतर्गत गुणवत्ता कक्ष समन्वयक प्रा . डॉ.घनश्याम जगताप, परिसंवादाच्या मुख्य समन्वयिका प्रा. डॉ. मनीषा शुक्ल, परिसंवादाच्या सह समन्वयिका प्रा. चंद्रप्रभा निकम, इतर सर्व प्राध्यापक , सी .एस. आर. डी.अहिल्या नगर समाजकार्य महाविद्यालयाची 76 विद्यार्थी, डॉ.विजय संसारे, प्रा सायली तोरणे, तसेच नाशिक शहरातील विविध महाविद्यालयाचे 80 विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे स्वागत पर मनोगत प्राचार्य,डॉ. विलास देशमुख सरांनी केली यामध्ये त्यांनी समाजकार्य विषयासंदर्भात, महाविद्यालयाची संपूर्ण माहिती देऊन प्रवेश प्रक्रिया तसेच या प्रकारच्या परिसंवादातून विद्यार्थ्यांना हे विकासाच्या व संशोधनाच्या दृष्टिकोनात कशी सुधारणा याबाबत मनोगत व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेची शिक्षणअधिकारी डॉ. नितीन जाधव सरांनी या परिसंवादास शुभेच्छा देऊन अशा प्रकारचे परिसंवाद आजही होतात याचाच अर्थ महिला सक्षमीकरण अजून झाले नाही, अशी खंत व्यक्त केली. अशा प्रकारचा परिसंवादातून विचार मंथन होणे आवश्यक आहे .असे प्रतिपादन केले . या प्रसंगी आय .एम .आर. टी. चे संचालक डॉ .प्रशांत सूर्यवंशी सरांनी या परिसंवाद शुभेच्छा देऊन वैचारिक प्रगतीसाठी अशा प्रकारचे परिसंवाद महाविद्यालयांमध्ये होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. मनीषा शुक्ल यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा डॉ.सुनिता जगताप यांनी केले .सूत्रसंचालन प्रा. डॉ.प्रतिभा पगार यांनी केले .




उद्घाटन नंतर प्रथम सत्रात अंजली मायदेव/ आंबेडकर यांनी आपल्या बीज भाषणामध्ये प्राचीन काळापासून महिलांची स्थिती महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांचे संदर्भ देऊन महिला विकासाची दिशा कशी बदलत गेली त्यानंतरच्या काळात इंग्रज प्रशासन तसेच संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महिलांच्या विकासाबाबतचा दृष्टिकोन ,जगामधील महिलांच्या सामाजिक, आर्थिक समानतेसाठी असणाऱ्या चळवळी तसेच भारतातील ग्रामीण भागातील महिलांची स्थिती, महिलांच्या स्थितीमध्ये जातीय, समाजकारण व राजकारण अशी विस्तृत माहिती व वैचारिक प्रगल्भता निर्माण करणारी काही मुद्दे आणि प्रश्न निर्माण करुन परिसंवादाला दिशा दिली. यानंतरच्या तांत्रिक सत्रामध्ये दहा विद्यार्थ्यांनी आपले संशोधन विषयक लेख सादर केले त्यामध्ये अंजली परदेशी आणि किरण कडनोर यांनी “महिला सबलीकरणात अंगणवाडी सेविकांचा सहभाग”, पियुशा सुरवाडे आणि साक्षी दिंडोरकर यांनी “आजीच्या पुस्तकांचे हॉटेल” , रसिका पोटे व कल्याणी माळी यांनी “सुपर वुमन सिंड्रोम एक अध्ययन”, रुपाली भांगरे आणि जयश्री भडांगे यांनी “महिला सामाजिक सुरक्षा हेल्पलाइन नंबर संदर्भात मुलींमधील जनजागृती” , योगिता निंबाळकर आणि प्रल्हाद यांनी “नवविवाहित आदिवासी महिलांच्या शिक्षण विषयक समस्यांचे अध्ययन” कार्तिक वाळके “पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनचा महिला सक्षमीकरणातील विविध विचार” दिपाली चौधरी व शरद भोई यांनी “लाडकी बहीण योजनेच्या लाभ घेणाऱ्या महिलांचे अध्ययन” ,जयश्री भालकी आणि भारती जाधव यांनी “तोरण शेत गावातील शौचालयाच्या सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांना येणाऱ्या अडचणी” अशा महिलांच्या विकास विषयक पैलूंवर विद्यार्थ्यांनी आपला अभ्यास पेपर सादर केला.

या सत्राचे परीक्षण डॉ.मयंक परमार यांनी केले असून आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना संशोधन पेपर विषयी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांनी संशोधन कशी करावी ,तसेच त्यामध्ये कोणकोणती शास्त्रीय मुद्दे असावीत, तसेच राजकारण, समाजकारण आणि यामधून स्थानिक

स्थिती याचा आढावा घेत संशोधन असावे असे प्रतिपादन केली. या सत्रा मध्ये सी एस आर डी. अहिल्यानगर समाजकार्य महाविद्यालयातील येथील 80 विद्यार्थी तसेच देखील प्रा. डॉ. विजय संसारे सर व इतर स्टाफ उपस्थित होता तसेच या प्रथम सत्र मध्ये प्रा. चंद्रप्रभा निकम यांनी पाहुण्यांचा परिचय व सत्र समन्वय केला.

या परिसंवादाच्या दुपारच्या सत्रामध्ये प्रमुख अतिथी अहिल्यानगर समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा. डॉ विजय संसारे व डॉ मयंक परमार हे उपस्थित होते. त्यांचे स्वागत समाजकार्य महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता कक्ष चे प्रमुख प्रा. डॉ.घनश्याम जगताप यांनी त्यांचे स्वागत केले. दुसऱ्या सत्रामध्ये एकूण 11 विद्यार्थ्यांनी आपले संशोधन विषयक लेख सादर केली. यामध्ये रुचिता बिरारी व ऋषिकेश कासार यांनी "सामाजिक माध्यमे व महिला सक्षमीकरण" , निकिता लोंढे व अक्षरा निकम यांनी "शिक्षित महिला ते गृहिणी प्रवास एक अध्ययन" , भावना साळुंखे या विद्यार्थिनीने "महिला सशक्तिकरण व राजकारण" पूजा भोये या विद्यार्थिनीने "महिला व उद्योजकता विकास" निकिता वरकड आणि प्रेरणा तवर यांनी "सहकार क्षेत्र आणि महिला विकास" गायत्री गुंजकर या विद्यार्थिनीने" रशिदा बी व चंपादेवी यांचा यष्टि अध्ययन "पद्धती विषयक पेपर सादर केला, तनुश्री आणि गौरव किरकिरा यांनी "वस्तीतील महिला आणि पाणी प्रश्न" शाम घारे आणि फाशा गोरे यांनी महिला सबलीकरण विषयी विद्यार्थिनींचा दृष्टिकोन याविषयी पेपर सादर केला , मोहिनी जाधव व चेतन खोकले यांनी "..L.G.B.T.Q.+समुदायाचे प्रश्न" त्याचबरोबर अहिल्यानगर समाजकार्य महाविद्यालयातील श्री. संतोष सूर्यवंशी यांनी पेसा कायदा व महिला "सक्षमीकरण" याविषयी आपला संशोधन पेपर सादर केला. तसेच के.टी.एच.एम. महाविद्यालयाचे समाजशास्त्र व मानसशास्त्र विषयाच्या नीलम भोजने व शक्तिप्रिया शिंदे यांनीही आपले संशोधन विषयक पेपर सादर केले.विद्यार्थ्यांनी आपले संशोधन पेपर सादर केले दुसऱ्या सत्राचे सूत्रसंचालन प्रा नारायण गभाले व प्रा. डॉ. सुनीता जगताप यांनी केले.

या सामाजिक आव्हान परिसंवादाच्या शेवटी संपूर्ण दिवसभराचा अहवाल सादर करण्याचे काम प्रा.प्रतिमा पवार यांनी केली तसेच परिसंवादाच्या शेवटी आभार प्रदर्शन प्रा. डॉ. मनीषा शुक्ल यांनी केले. या समारोप सत्राचे समन्वय प्रा . डॉ.सोनल बैरागी यांनी केले